# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १५/६/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०३) इतिवृत्त

सोमवार, दिनांक १५जुन २००९ रोजी स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ०४.०५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (म) श्री.उध्दव घुगे, उपआयुक्त (प्र) श्री.एम.वाय.कांबळे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
३. श्री.जावेद हसन खान
४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
५. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
७. श्री. घडमोडे भगवान देविदास
८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
१०. श्री.सुरे सिताराम इसराम
११. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
१३. श्री.शिंदे दामोधर माधवराव
१४. श्री. प्रल्हाद निमगांवकर

**विषय क्र. १० :**

दिनांक **९/२/२००९** (का.प.क्र.२१), **१३/२/२००९** (का.प.क्र.२२), **२०/२/२००९** (का.प.क्र.२३), **२६/२/२००९** (का.प.क्र.२४), दि.**९/४/२००९** (का.प.क्र.०१) व दिनांक **३०/५/२००९** (का.प.क्र.०२), रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : विषय पत्रिका घेण्याच्या अगोदर ज्या विभागाकडून किंवा प्रशासनाकडून प्रस्ताव येतात ते घेण्याच्या पध्दती काय आहे. ऐणवेळेचे प्रस्ताव व जे प्रस्ताव आलेले आहेत ते डेट वाईज आपल्याकडे घेतले जातात किंवा कसे. जे प्रस्ताव येतात ते डेट वाईज घेण्यात यावे.

मा.सभापती : ऐनवेळी प्रशासन जे प्रस्ताव पाठविले जातात ते घेतले जातात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रशासनाकडुन आलेले ऐनवेळेचे प्रस्ताव घेतले जातात तसे इतरही प्रस्ताव घेतले पाहिजे.

श्री.सतिष कटकटे : ऐनवेळेचे जे प्रस्ताव येतात त्यात पुढील इतिवृत्तांमध्ये नंबर टाकुन येतात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एन-६ येथील प्रस्ताव केव्हा आला आहे व घेतला केव्हा या अगोदर आलेल्या प्रस्तावाची डेट कुठली आहे.

श्री.सतिष कटकटे : एन-६ येथील प्रस्ताव प्रशासकीय प्रस्ताव आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक १० मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक १० मधील दिनांक ०९.०२.२००९, दि.१३.०२.२००६, दि.२०.०२.२००९, दि.२६.०२.२००९ आणि दि.३०.०५.२००९ इतिवृत्त आहे दि. ०९ तारखेचा विषय क्रमांक २०२, या पुर्ण इतिवृत्तात २५ ते ३० कामे डांबरीकरणाची आहेत. डांबरीकरणाचे कामे हे टेंडररेट मधील आहे. याच इतिवृत्तामध्ये काही ठराविक वळेचे ठराविक महिण्यांचेच कामे हे above आहेत. वर्ष दोन वर्षाचा गॅप न राहता दोन,सहा महिण्यांच्या आतच २७ टक्के जास्त दराने विषय क्रमांक २०२ चा आहे तसेच विषय क्रमांक २०३ जकातीत १० पट दंड लावण्याचा आहे चर्चेमध्ये ५० टक्के करण्यात आले सभागृहाने मान्यता दिली की, १० पट दंडामध्ये १०० टक्के वाटा महानगरपालिकेला मिळत होता, सदस्यांच्या मागणीवरून ५० टक्के करण्यात आला. सुचक अनुमोदक नगरसेवक होउन ठराव ठेवतात. या संदर्भात विचारणा केली असता बायलॉजमध्ये तशी तरतुद आहे अशी माहिती मिळाली.

मा.सभापती : बायलॉजमध्ये तशी तरतुद आहे.

श्री.सतिष कटकटे : काही अशी कामे आहेत की, वर्षभरापासून सांगून सुध्दा झालेली नाही त्यामुळे जनतेची मागणी असल्यामुळे नगरसेवकांना प्रस्ताव ठेवावे लागतात. प्रशासनाने जबाबदारी पार पाडली असतीतर नगरसेवकांना प्रस्ताव ठेवण्याची गरज पडली नसती. आमच्या वॉर्डातील समस्या असतील प्रश्न असतील तर आम्हाला बोलावेच लागेल.

श्री.रविकांत गवळी : दोन ते तिन विषय एकत्र आल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आहे रस्त्याविषयी खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : ५ (२) २ चे कामे आहेत त्याचा वापर कसा केला पाहिजे. मा.आयुक्त, विभाग प्रमुखांनी बसून ठरवावे. सिध्दार्थ गार्डन येथील तार काढण्याचे, हजला स्वच्छालय करायचे, अजून हजची यात्रा पुढे आहे. दफनविधीचे कामे ५ (२) २ नुसार करायची, बोलण्याचा उद्देश असा की, ज्या ठिकाणी तातडी असेल तिथे वापरण्यास हरकत नाही. ५ (२) २ चे जवळपास दहा कामे आहे ५ (२) २ ची प्रायरोटी प्रशासनाने सांगीतले पाहिजे. एकाच विषयपत्रीकेत टेंडरची कामे येतात त्याच विषयपत्रीकेत १२ ते १३ अशी कामे आहेत की, १० ते १५ टक्के above आहे .

मा.सभापती : ई-टेंडरची प्रक्रीया आहे.

श्री.प्रशांत देसरडा : डांबरीकरणा संदर्भात ई टेंडरींग नाही हि अधिकारी टेंडरींग आहे. मी एक दिवस अगोदर सांगू शकेल की काम कोणाला मिळेल छोटया छोटया नगरसेवकांच्या कामासाठी ई टेंडरींग आहे, डांबरीकरणा संदर्भात ई टेंडरीग नाही. ५ (२)२ मध्ये विषय क्रमांक २७० मध्ये १९ लाखाचे दप्तर खरेदीचे काम

दिले. निवीदा काढली आणि १० टक्के कमी आली तर महानगरपालिकेचा फायदा आहे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा. निविदेवर आपला विश्वास नाही.

श्री.प्रशांत देसरडा : रझागीरीमध्ये एवढा अत्याचार नव्हता.

अति.शहर अभियंता : जेव्हापासून महानगरपालिकेत ई-टेंडरींग पध्दत सुरू झालेली आहे तेव्हापासून प्रत्येक काम हे ई टेंडरींगद्वारे निवीदा काढल्या जातात. त्याप्रमाणे त्या स्विकारल्या जावून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी येतात.

मा.सभापती : ई टेंडरींग मॅनेज करून सर्व कामे दिली जातात असे आरोप स.सदस्यांनी लावले आहे खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : हे सर्व भारतातमध्ये ऑनलाईनवर काम होते.

श्री.प्रशांत देसरडा : डांबरीकरणाचे कामे बसुन वाटुन दिली जातात. मी एक दिवस अगोदर सांगीतले की, त्या कंत्राटदाराला माझ्या वॉर्डातील कामे देवु नका याबाबतची माहिती मला कशी झाली.

अति.शहर अभियंता : ई टेंडरद्वारा कामे मिळाली असेल यात अधिकाऱ्याची काय चुक आहे. याबाबतीत अधिकाऱ्याची चुक नाही मा.सभापती याबाबतीत कोणीतरी आपल्या मधला, आपल्या महानगरपालिकेचा कुणीतरी एक अधिकारी स.सदस्यांना चुकीचे सांगुन माहिती देत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : कोणत्याही एका अधिकाऱ्यावर बोलणारा मी सदस्य नाही. एखादा अधिकारी नगरसेवकाला सांगेल आणि तो नगरसेवक इथे सांगेल.

मा.सभापती : ई टेंडरींग पध्दत चुकीची असेल तर ती बंद करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात येईल. स.सदस्यांनी सिध्द करून दाखवावे की ई टेंडरींग चुकीच्या पध्दतीने आहे त्यांच्यावर गुन्हा दाखल करू.

श्री.प्रशांत देसरडा : ई-टेंडरींग डांबरीकरणासाठी नाही. लहान लहान कामांसाठी आहे. आपला आपसात वाद नाही. १९ लाखाचे शाळांचे दप्तर खरेदी विषय क्र.२७० निविदा काढली असती तर १०% कमी आले असते.

अति.शहर अभियंता : २-२.५ वर्षापासुन ई-टेंडरींगचे कामे सुरू आहे. प्रत्येक काम ई-टेंडरींग द्वारे होते.

मा.सभापती : विषय क्रमांक १० दुरूस्तीसह विषय क्रमांक १० मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक २२० महावीर स्तंभ संदर्भात एक ठराव केला होता त्याचे आजपर्यंत काय झाले या संदर्भात संबधीत अधिकाऱ्याने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : ज्या कंपनीला स्थायी समितीकडुन मंजुरी मिळाली आहे परंतु मध्यंतरी आचारसंहिता असल्यामुळे त्यांना आदेश दिले गेले नव्हते आदेश देण्याची कारवाई सुरू आहे.

मा.सभापती : वर्क ऑर्डर देण्यात यावे.

अति.शहर अभियंता : वर्क ऑर्डर लगेच देण्यात येईल.

मा. सभापती : दिनांक २०/२/२००९ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.२२९ मिरां सलामी व्यापारी संकुलातील उर्वरीत जागा/गाळे सुप्रीम एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी या संस्थेस जागा/गाळे नेहमीच्या अटी-शर्तीनुसार

भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दि.२०/२/२००९ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.२२९ मध्ये "सादिया टॉकीजच्या मागील बाजुस असलेल्या मिरां सलामी व्यापारी संकुलातील उर्वरीत जागा/गाळे गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे, नागरीकांना आरोग्याशी संबंधीत माहिती देण्याचे कार्य करणारी मान्यताप्राप्त संस्था सुप्रीम एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी या संस्थेस जागा/गाळे नेहमीच्या अटी-शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते." या व इतर दुरूस्त्यासह दि. ९/२/२००९, १३/२/२००९, २०/२/२००९, २६/२/२००९, दि.९/४/२००९ व दिनांक ३०/५/२००९, रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मो.हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी विरंजक चुर्ण (ब्लीचींग पावडर) चा पुरवठा करणे बाबतच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,०१,२००/- चे तयार करण्यात आलेले असुन सदरील कामाचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रसायन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षकातून करण्यात येत आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,०१,२००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक ११ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी विरंजक चुर्ण (ब्लीचींग पावडर) चा पुरवठा करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,०१,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.देवदत्त विश्वनाथ महाजन, कनिष्ठ लिपीक, खडकेश्वर वाचनालय यांचे आईच्या आजारपणावर (Cancer) यापुर्वी रक्कम रू.१,१२,३००/- एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच यानंतर त्यांनी दाखल केलेल्या देकांपैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.२,६९,०३७/- एवढी आहे. अनुज्ञेय रक्कम रू.२,३५,४७३/- च्या ९०% रक्कम रू.२,११,९२५/- (अक्षरी रूपये दोन लाख अकरा हजार नऊशे पंचवीस फक्त) पैकी ५% रक्कम रूपये १३,४५२/-(अक्षरी रूपये तेरा हजार चारशे बावन्न फक्त) (एकुण देयक रक्कम रू.२,६९,०३७/- च्या ५% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित रक्कम रूपये १,९८,४७३/- (अक्षरी रूपये एक लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे त्र्याहत्तर मात्र) एवढी रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करीता संबंधीतास पुर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रू.१,१२,३०० + दुसऱ्यांदा सादर केलेल्या देयकांपैकी अनुज्ञेय र.रू.१,९८,४७३ = एकुण रक्कम रू.३,१०,७७३/- (अक्षरी रूपये तीन लाख दहा हजार सातशे त्र्याहत्तर फक्त) च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्रमांक १२ मध्ये देयकाचे अनुज्ञेय रक्कमे बाबत (रू.२,६९,०३७/-) दुरूस्ती/तपासणी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेश्री.देवदत्त विश्वनाथ महाजन, कनिष्ठ लिपीक, मनपा खडकेश्वर वाचनालय यांचे आईच्या आजारपणावर (Cancer) यापुर्वी दाखल केलेल्या वैद्यकीय खर्चापोटी अदा करण्यात आलेले अनुज्ञेय रू.१,१२,३००/- व दुसऱ्यांदा सादर केलेल्या देयकांपैकी अनुज्ञेय रू.१,९८,४७३/- असे एकत्रित रक्कम रू.३,१०,७७३/- (अक्षरी रूपये तीन लाख दहा हजार सातशे त्र्याहत्तर फक्त) च्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.राजेंद्र जिजासाहेब जाधव, अनुरेखक, नगर रचना विभाग यांना स्वतःच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी (Ascending Aortic Dialation & Severe AR for Root Replacement) कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००९/११६, दिनांक १५/१/२००९ अन्वये रू.१,५०,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पन्नास हजार मात्र) अग्रीम मंजुर करण्यात आले. मनपा वैद्यकीय परतावा विनियम परिपत्रक दिनांक १/१२/१९९४ गंभीर आजार क्र.०१ तीव्र हृदय रोगानुसार प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर आजारपणावर त्यांनी दाखल केलेल्या वैद्यकीय खर्च रू.३,६४,१८१/- एवढा खर्च झालेला आहे. प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.३,६१,३३१/- एवढी आहे. सदरील अनुज्ञेय रक्कमेच्या ९०% रक्कम रू.३,२५,१९७/- (अक्षरी रूपये तीन लाख पंचवीस हजार एकशे सत्त्याण्णव फक्त) पैकी ५% रक्कम रूपये १८,२०९/- (अक्षरी रूपये अठरा हजार दोनशे नऊ मात्र) (एकुण सादर केलेले देयक रक्कम रू.३,६४,१८१/- च्या ५% प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरित रक्कम रूपये ३,०६,९८८/- (अक्षरी रूपये तीन लाख सहा हजार नऊशे अठ्ठ्याऐंशी मात्र) रक्कम अदा करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

करीता रक्कम रू. ३,०६,९८८/- च्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत प्रसताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.राजेंद्र जिजासाहेब जाधव, अनुरेखक, नगर रचना विभाग यांना स्वतःच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी (Ascending Aortic Dialation & Severe AR for Root Replacement) झालेल्या खर्चापोटी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रक्कम रू.३,६१,३३१/- च्या ९०% रक्कम रू.३,२५,१९७/- (अक्षरी रूपये तीन लाख पंचवीस हजार एकशे सत्त्याण्णव फक्त) पैकी ५% रक्कम रूपये १८,२०९/- (अक्षरी रूपये अठरा हजार दोनशे नऊ मात्र) मनपा फंडात जमा करून उर्वरित रक्कम रूपये ३,०६,९८८/- (अक्षरी रूपये तीन लाख सहा हजार नऊशे अठ्ठ्याऐंशी मात्र) रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४ :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड 'ब' व 'क' प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्रमांक २ अंतर्गत सुरेवाडी भागात १००, १५०, २५० व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकणे या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन २००८-०९ च दरसुचीनुसार रक्कम रू.४४,४२,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.४४५ दि.२/३/२००९ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे.

ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता दर भरलेली १ (एक) निविदा प्राप्त झाली. तपशील खालीलप्रमाणे.

१. उदय इंजिनियरींग वर्क्स - १९.०१% जास्त दराने

उपरोक्त नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.०१% जास्त दराची निविदा उदय इंजिनियरींग वर्क्स यांची असुन संबंधीत गुत्तेदार यांना दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलावून त्यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने काम करण्यास सांगितले असता त्यास गुत्तेदाराने नकार दिला व पत्र देऊन सदरील काम १५% जास्त दराने देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराचे निविदेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

करीता उदय इंजिनियरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने निविदा सिवकृती बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एक टेंडर आले तर ते स्विकारायचे काय?
मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.
कार्यकारी अभियंता : तिन वेळेस निवीदा निघालेली आहे.
श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : तिन्ही वेळेस सदरचाच कंत्राटदार आहे काय?
कार्यकारी अभियंता : तिन्ही वेळेस वेगवेगळे कंत्राटदार आहे.
मा.सभापती : ऐनवेळेचे सर्व मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्रमांक २ अंतर्गत सुरेवाडी भागात १००, १५०, २५० व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकणे या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदानुसार संबंधीत गुत्तेदाराशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम उदय इंजिनियरींग वर्क्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.३९ राजाबाजार येथे संस्थान गणपती ते जाधवमंडी रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रू.१२,९४,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२३३ दि.२६/२/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा विक्री झाल्या स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या बाबतचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ५.५% जास्त दराने |
| २. | मे.राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा १०.००% जास्त दराने |
| ३. | मे. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा १५.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५% जास्त दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची आहे. प्रत्यक्ष चर्चेत संबंधीत गुत्तेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याची तयारी दर्शविलेली आहे. मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती समोर निविदा मंजुरीबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३९ राजाबाजार येथे संस्थान गणपती ते जाधवमंडी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १६ :</u>**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जल निर्जंतुकीकरणा करीता आवश्यक असलेल्या क्लोरीनचा वार्षिक पुरवठा करण्यासाठी रक्कम रू.२७,३२,४००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभ दि.१२/२/२००९ ठराव क्र.४१७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संबंधी ई-निविदा विभागामार्फत निविदा प्रक्रीया करण्यात आली असता निविदा दाखल करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरलेले दोन डी-फॉर्म निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ) **रंग रसायन पुणे** :

१) ९०० कि. ग्रँ. टनर - रू.९०००/- प्र.मे.टन

२) १०० कि.ग्रँ. सिलेंडर - रू.५०,०००/- प्र.मे.टन

ब) **मधुमय उद्योग मुंबई :**

१) ९०० कि. ग्रँ. टनर - रू.८३७७/- प्र.मे.टन

२) १०० कि.ग्रँ. सिलेंडर - रू.४०००/- प्रति नग

प्राप्त दरानुसार मे. मधुमय उद्योग, मुंबई यांचे दर कमी आहेत. प्राप्त कमी दरानुसार खरेदी केल्यास खालील प्रमाणे खर्च होईल.

१) ९०० कि. ग्रँ. टनर - १९६ मे.टन X ८३७७/- प्र.मे.टन = रू.१६,४१,८९२.००

२) १०० कि.ग्रँ. सिलेंडर - <u>२० नग X ४०००/- प्रति नग</u> = रू.८०,०००.००

तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३६.९९% कमी दराचे आहेत. तसेच मागच्या वर्षीच्या मंजुर पुरवठा दरापेक्षा १०.९१% कमी दराचे आहेत. सदरील पुरवठ्यासाठी अर्थसंकल्प २००९-१० अंतर्गत स्पिल ओव्हर कामांच्या यादीत रू.२७.३२ लक्ष इतकी तरतुद करण्याची मागणी लेखा विभागाकडे करण्यात आली आहे.

मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने क्लोरीन खरेदी करण्याच्या कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता मधुमय उद्योग, मुंबई यांची निविदा

१) ९०० कि. ग्रँ. टनर - रू.८३७७/- प्र.मे.टन

२) १०० कि.ग्रँ. सिलेंडर - रू.४०००/- प्रति नग

या दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव तसेच एकुण रक्कम रू.१७,२१,८१२/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जल निर्जंतुकीकरणा करीता आवश्यक असलेल्या क्लोरीनचा वार्षिक पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची (१) ९०० कि. ग्रँ. टनर-रू.८३७७/-

प्र.मे.टन (२) १०० कि.ग्रॅ. सिलेंडर-रू.४०००/- प्रति नग या दराची मधुमय उद्योग, मुंबई यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी, साईनगर एन-६, आणि सिंहगड कॉलनी, एन-६ येथील अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.९,९५,००/- यास दि.२७/१२/०८ रोजी मा.शहर अभियंता यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द केली असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या असुन, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.मस्कत कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ६.५५% जास्त दराने |
| २. | मे. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा १२.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.५५% जास्त दराची निविदा मस्कत कन्स्ट्रक्शन कंपनी यांची असुन सदर निविदेस मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी मा.आयुक्तांची दिनांक १५/५/२००९ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे. सदर निविदा ६.५५% जास्त दराची असल्याने कामासाठी वाढीव खर्च रू.६५,१७३/- इतका होत आहे.

तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.५५% जास्त दराची मस्कत कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी, साईनगर एन-६, आणि सिंहगड कॉलनी, एन-६ येथील अंतर्गत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मस्कत कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.५५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५९ अजबनगर-खोकडपुरा या वॉर्डात शिवाजी हायस्कुलच्या बाजुला मा.ना.श्री.राजेश टोपे यांचे निवासस्थानापासून पटेल कॉलनी पर्यंतची ड्रेनेज लाईन १५ वर्षापुर्वी टाकण्यात आलेली आहे. येथील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. सदरील ड्रेनेज लाईन तातडीने बदलणे आवश्यक आहे. ही ड्रेनेज लाईन बदलण्याकरीता नागरीकांनी अनेकवेळा तक्रारी केलेल्या आहेत. परंतु ड्रेनेज लाईन बदलण्यात आलेली नाही. वारंवार ड्रेनेज लाईन चोकअप झाल्याने नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. तरी सदर ड्रनेज लाईन बदलण्याचे काम तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२)(२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सतीश कटकटे अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ अजबनगर-खोकडपुरा या वॉर्डात शिवाजी हायस्कुलच्या बाजुला मा.ना.श्री.राजेश टोपे यांचे निवासस्थाना पासून पटेल कॉलनी पर्यंतची ड्रेनेज लाईन तातडीने बदलण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड

प्रकरण ५ चे नियम (२)(२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर किराडपुरा अंतर्गत खालील कामे तातडीने करणे आवश्यक आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहे. सदरील रस्त्यांवर पावसाचे पाणी साचते त्यामुळे चिखल हाऊन नागरीकांना रस्त्यावर जाणे-येण्याकरीता त्रास होतो. तरी खालील दर्शविलेली कामे तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात यावे.

१) यासिन मस्जीद समोरील रस्ता हाशमभाई यांच्या घरापासुन दुध डेअरी पर्यंत इटालीयन पेव्हर ब्लॉक बसविणे - अंदाजित खर्च ५.०० लाख

२) जहीर किराणा ते तसलीमभाई यांच्या घरापर्यंत अशरफीया मस्जीद समोरील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे - अंदाजित खर्च ५.०० लाख

३) हमजा मस्जीद समोरील रस्ता पाशुभाई यांच्या घरापासुन रफीक मेमन यांच्या घरापर्यंत सिमेंट रोड करणे - अंदाजित खर्च ५.०० लाख

४) माजी नगरसेविका नईमाबाजी यांच्या घरापासुन इकराम साहेब यांच्या घरापर्यंत उस्मानीया मस्जीद समोरील रस्ता कॉंक्रेटींग करणे - अंदाजित खर्च ५.०० लाख

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा अनुमोदक : सतीश कटकटे, रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) यासिन मस्जीद समोरील रस्ता हाशमभाई यांच्या घरापासुन दुध डेअरी पर्यंत इटालीयन पेव्हर ब्लॉक बसविणे-अंदाजित खर्च ५.०० लाख, (२) जहीर किराणा ते तसलीमभाई यांच्या घरापर्यंत अशरफीया मस्जीद समोरील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे - अंदाजित खर्च ५.०० लाख, (३) हमजा मस्जीद समोरील रस्ता पाशुभाई यांच्या घरापासुन रफीक मेमन यांच्या घरापर्यंत सिमेंट रोड करणे -अंदाजित खर्च ५.०० लाख, (४) माजी नगरसेविका नईमाबाजी यांच्या घरापासुन इकराम साहेब यांच्या घरापर्यंत उस्मानीया मस्जीद समोरील रस्ता कॉंक्रेटींग करणे- अंदाजित खर्च ५.०० लाख, ही सर्व कामे तातडीने करून घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र. ५ मधील पहाडसिंगपुरा येथे नवीन तयार करण्यात आलेल्या रोडवर विद्युत खांब व पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विद्युत दरसुची सन २००७-०८ नुसार रक्कम रू.४,९८,४९५/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च वर्ष २००९-१० प्रभाग-अ च्या स्पील ओव्हर कामाच्या यादीतील नवीन पथदिव्यांची व्यवस्था या लेखा शिर्षकातुन करण्यात येत आहे.

करीता स्थायी समितीमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत असून मा.आयुक्तांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.४,९८,४९५/- चे काम मु. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत उपलब्ध एजन्सीमार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५ मधील पहाडसिंगपुरा येथे नवीन तयार करण्यात आलेल्या रोडवर विद्युत खांब व पथदिव्यांची व्यवस्था करण्यासाठी रक्कम रू.४,९८,४९५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करून घेण्याकरीता मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत उपलब्ध एजन्सीमार्फत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग-ड भागातील घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाईसाठी व डोअर-टु-डोअर कलेक्शनसाठी भाग अे, बी, सी भागात विभाजन करून कंत्राटदारांना काम देण्यात आले होते. प्रभाग अधिकारी व संबंधीत स्वच्छता निरीक्षक, प्रभाग-ड यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार प्रभाग-ड मधील भाग बी व सी मधील सफसफाई व डोअर-टु-डोअर कलेकशनचे काम कंत्राटदारांनी त्यांचे काम अनुक्रमे दि.१८/८/०८ व दि.९/८/०८ पासुन बंद केले आहे. खाली दर्शविलेल्या कंत्राटदारांना दि. ३१ जानेवारी २००९ पर्यंत मुदतवाढ मा.स्थायी समितीने दिली होती.

**साफसफाईचे काम**

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली | देयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | मे. ईश्वरलाल खरे | फेब्रुवारी ०९ ते मे २००९ | ३,३६,३०२/- | १३,४५,२०८/- |

**डोअर टू डोअर कलेक्शनचे काम**

| भाग | कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली | देयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | जागृती इंटरप्रायजेस | फेब्रुवारी ०९ ते मे २००९ | ३,०१,६६२/- | १२,०६,६४८/- |

प्रभाग अधिकारी, प्रभाग-ड यांनी दिलेल्या अभिप्राया नुसार सदरील कंत्राटदारांनी माहे फेब्रुवारी ०९ ते मे २००९ या कालावधीत वरील कंत्राटदारांनी केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड प्रभागातील घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाईसाठी व डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी विभागजन केलेल्या "ए" भागासाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संबंधीत कंत्राटदाराचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपर्यंत काम करून घेतले असल्यामुळे सदरील केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**साफसफाईचे काम -**

| भाग | साफसफाईचे कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली | देयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | मे. ईश्वरलाल खरे | फेब्रुवारी ०९ ते मे २००९ | ३,३६,३०२/- | १३,४५,२०८/- |

**डोअर टू डोअर कलेक्शन -**

| भाग | कंत्राटदाराचे नांव | मुदतवाढ | बोली | देयक रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | जागृती इंटरप्रायजेस | फेब्रुवारी ०९ ते मे २००९ | ३,०१,६६२/- | १२,०६,६४८/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : दिनांक १३.०२.२००९ ला स.सदस्य श्री.मेघावाले आणि श्री.रविकांत गवळी यांनी एक विषय मांडला होता की सिडको हडकोच्या मालमत्ता हस्तांतरण संदर्भांत आदेशीत केले होते की, १५ दिवसांत मालमत्तांची यादी सादर करावी. या बाबतीत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा : सलिम अलि सरोवर येथील टेंडर काढण्यात येणार आहे परंतु सदरील जागा महानगरपालिकेची आहे काय? टेंडर काढण्यापूर्वी पी.आर. कार्ड तयार करण्यात यावे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उप अभि.(BOT) : सलिमअलि सरोवर सिडको मार्फत महानगरपालिकेला हस्तांतरण करण्यात आले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : जागेसंदर्भात कोणी objection घेतलेले आहे काय?

उप अभि.(BOT) : सलिम अलि सरोवराच्या जागेसंदर्भांत आत्तापर्यंत आमच्याकडे कोणी आक्षेप घेतलेला नाही.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाचे अभिनंदन करायला पाहिजे. शहरात जे अतिक्रमण होते त्याला अंकुश लावण्यासाठी प्रशासकीय अधिकारी नेमावा असे आदेश दिले होते त्या आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे. आपल्या चर्चाअंती एक निर्णय पुर्ण झालेला आहे प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.विनायक पांडे : प्रशासकीय अधिकारी कोण आहे.

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी म्हणून श्री.जरारे आहेत. आपण मा.आयुक्तांना विनंती केली होती मा.आयुक्तांनी स्वाक्षरी केली होती. बाकीची प्रक्रीया उपआयुक्त (म) श्री.घुगे यांनी केलेली आहे मा.आयुक्त व मा.श्री.घुगे यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.रविकांत गवळी : वॉर्ड ई कार्यालयात हे गेल्या तिन वर्षापासून रिकामे पडलेले आहे तिथे दोन रूम आहे रोड वाईंडिंग मध्ये जे भाडेकरू बाधीत झालेले आहे त्यांना देण्यास हरकत नाही. त्याच अनुषंगाने पुर्ण प्रशासकीय मंजूरी झाली आहे व पुन्हा आपल्यासमोर एक ठराव आलेला आहे ८०० स्के.फुटाची जागा आहे आर आर नुसार १०००० रूपये चौ.मि.दराप्रमाणे त्यास दर लावण्यात आलेले आहे. एका रूमला १८००० प्रमाणे दर महिण्याला भाडे येते. सदरील रूम गेल्या तिन वर्षापासुन रिक्त आहे. आर आर नुसार ५४(१) ची समिती गठीत करून एक दर काढण्यात येतो औरंगपूरा येथील रूमलाही १८ हजार भाडे नाही. सामाजिक संस्था आहे ती १८ हजार दर महा भाडे देवू शकत नाही. या संदर्भात ऐणवेळेचा प्रस्ताव आलेला आहे त्यास कमीत कमी भाडे लावून जागा भाडेतत्वावर

देण्यात यावी. या अटींमुळे मनपाच्या जागा/दुकाना रिकाम्या राहत आहे. मीरां सलामी अंडर ग्राउंड मध्ये सहा-सहा महिणे पाणी साचुन राहते. त्या दुकाना शैक्षणिक संस्थेला भाडयाने देण्यासाठी ठरविले होते. २ लाख १६ हजार त्यांना प्रति महिना भाडे लावणार असेल तर ती व्यक्ती भाडयाने घेण्यासाठी येणार कसे. बाजार भावाप्रमाणेही भाडे येत नाही व दुकाना रिकाम्या राहतात.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : औरंगाबाद महानगरपालिका दिनांक २०.०३.२००७ संपन्न झालेल्या विषय क्रमांक २५ मध्ये दोन तासांची चर्चा झाल्यानंतर निर्णय झाला होता की, लमसम १००० रूपये १२०० रूपये दर फिक्स करून त्यांच्याकडुन भाडे आकारण्यात यावा. याची सुध्दा अंमलबजावणी झालेली नाही १२ महिण्यांचे आगाउ भाडे घेवून त्यांचेकडुन लिज ॲग्रीमेंट करण्यात येतो व स्टॅम्प डयुटी दुप्पटीने भरावी लागते याविषयी खुलासा करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : मिरां सलामी हॉल बांधकाम झाल्यापासून दुकाने रिकाम्या अवस्थेत आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : वार्ड फ येथील १० दुकाने रिकाम्या अवस्थेत आहे. भाडे वाढविल्यामुळे दुकाने कोणी भाडयाने घ्यायला तयार नाही.

श्री.प्रशांत देसरडा : सादिया टॉकीज येथील हॉलला बांधकाम होवुन १५ वर्ष झाले आहे निवीदा निघाल्या आहे. भाडे समितीत दर कमी करा. दुकाने भाडयाने द्यायची असेल तर विना डिपॉजिट भाडयाने देण्यात याव्यात महानगरपालिकेला भाडे सुरू होईल.

श्री.रविकांत गवळी : दुकान भाडे संदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाते परंतु आपल्या जाचक अटीं शर्तीमुळे दुकाने भाडयाने जात नाही.

श्रीमती मेहरुन्निसा खान : मालमत्ता अधिकाऱ्यांकडुन यादी मागवून दुकाने अंपग व्यक्तिंना दिल्या गेल्या पाहिजे.

मालमत्ता अधिकारी : मिरा सलामी हॉल बाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे, प्रशासनातर्फे प्रत्येक जागेचे,गाळेचे डिएसआर प्रमाणे कॅलक्युलेशन केले जाते त्याला मा.कार्यकारी अभियंता त्या त्या वार्डाची त्यांची मंजुरी घेतली जाते.

श्री.रविकांत गवळी : डिएसआरचा रेट भाडया संदर्भांत असतो की, विक्री संदर्भांत असतो.

मा.सभापती : डिएसआरचा रेट भाडे संदर्भांत असतो.

श्री.प्रशांत देसरडा : एखादया व्यापार संकुलसाठी पाच ते सहा वेळेस टेंडर काढले व त्याच्यानंतर ती भाडयाने जात नसेलतर भाडे समिती आपल्याकडे असते भाडे समितीत मा.आयुक्त,उपआयुक्त,मालमत्ता अधिकारी हे सगळे सदस्य असतात प्रशासनाकडुन या संदर्भांत असा प्रस्ताव गेलेला आहे का की सहा वेळेस टेंडर काढुन भाडयाने जात नाही. भाडे आणि डिपॉझिट कमी करा याबाबत भाडे समितीसमोर गेला आहे काय?

मालमत्ता अधिकारी : ४७ दुकानांसाठी भाडे केले होते मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव आला होता स्थायी समितीने त्यावेळेस प्रस्ताव reject केला होता व हया ज्या बाबी आहेत त्या नविनच आहे. प्रपोज केलेल्या त्या दुकानांच्या प्रसिध्दीच्या बाबतीत संचिका मा.आयुक्तांच्या समोर आहे. ती आल्यानंतर रितसर स्थायी समितीसमोर ठेवण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : ४७ दुकानांसदर्भात स्थायी समिती समोर प्रस्ताव आल्यानंतर स्थायी समितीने तो रद्द केला तो रद्द का केला.

मालमत्ता अधिकारी : भाडे अधिक असल्या कारणाने.

श्री.प्रशांत देसरडा : भाडे समितीकडे भाडे कमी का होत नाही. स्थायी समितीकडे भाडे कमी करून का पाठविले नाही.

मालमत्ता अधिकारी : भाडे समितीसमोर ठेवून भाडे निश्चित करून स्थायी समितीकडे मंजुरीकरीता ठेवला जातो.

श्री.बापू घडमोडे : ज्या दुकाना वारंवार लिलाव काढुनसुध्दा गेल्या नाही तर ते भाडे समितीला कळविले आहे का

मालमत्ता अधिकारी : जी दुकाना गेलेली नाहीत त्या रिजेक्ट केल्यानंतर परत स्थायी समितीसमोर ठेवणार आहेत.

श्री.बापू घडमोडे : एवढया दिवसांपासून का ठेवले नाही.

मालमत्ता अधिकारी : मध्यंतरी आचारसंहितेचा कालावधीमुळे ठेवले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : हर्ष नगर येथील दुकांनामध्ये दारू विक्री केली जाते. शेळ्या, मेंढ्या बसतात. पिया मार्केट येथे बिअर मिळेल.

श्री.बापू घडमोडे : आपल्या नॉर्मस्‌मध्ये हया दुकाना दारू विक्रीसाठी देता येतात का?

श्री.सतिष कटकटे : प्रिया मार्केटमध्ये वाईन शॉपच्या दुकाना आहेत.

श्री.बापू घडमोडे : लिलाव केव्हा झाला.

मालमत्ता अधिकारी : लिलाव नोव्हेंबरमध्ये झाला.

श्री.बापू घडमोडे : भाडे समितीसमोर ताबडतोब जायला हवे होते कारण महानगरपालिकेचे नुकसान होत आहे.

मा.सभापती : सदरचे अधिकार भाडे समितीला दयायचे काय?

श्री.प्रशांत देसरडा : अधिकार हे भाडे समितीलाच आहे.

श्री.रविकांत गवळी : ५४ (१)ची भाडे समिती गठीत केलेली आहे ती भाडे निश्चित करून स्थायी समितीकडे पाठवुन देते. ते आपण मान्य करतो.

श्री.बापू घडमोडे : अशा किती प्रॉपर्टीज्‌ आहे याचा लेखाजोखा झालेला आहे काय? या संबधीचा रेकॉर्ड असायला हवा.

मा.सभापती : दारू विक्री संदर्भातच्या बाबी आपल्या निर्देशनास आहे काय? प्रिया शॉप मध्ये वाईनची परवानगी दिली आहे काय?

मालमत्ता अधिकारी : नाही. आपण अशा प्रकारची कुठलीच परवानगी दिलेली नाही.

श्री.बापू घडमोडे : शहरात किती दुकाने आहेत.

मालमत्ता अधिकारी : एकुण ७२० दुकाना आहेत ६८ दुकानांचा लिलाव बाकी आहे.

श्री.बापू घडमोडे : एकुण ७२० पैकी ६८ दुकानांचा लिलाव बाकी आहे बाकीच्या दुकानांचे भाडे नियमीतपणे सुरू आहे असे मालमत्ता अधिकाऱ्यांचे म्हणने आहे. या बाबतची शहानिशा करण्यात यावी. रेकॉर्डवर घेण्यात यावे. सर्वे करून दखल घ्यावी.

मा.सभापती : यासंदर्भात संपूर्ण माहिती घेवुन पुढील बैठकीत सादर करण्यात यावी ६८ दुकांनापेक्षा जास्त शिल्लक राहिल्या तर आपल्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : जाफरगेट येथे व्यापारी संकुलात २३ दुकाने आहेत त्या ठिकाणी ०३ दुकाने अधिकच्या टाकण्यात आलेल्या आहेत. मा.उपआयुक्त, मालमत्ता अधिकारी

आणि मी स्वत: त्या दुकानांची पहाणी केली आहे. या तिन दुकाना कुणाच्या आहे भाडे कोण घेतो.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : त्यांचे असे म्हणणे आहे की, हि जी प्रॉपटी आहे वक्फ बोर्डाची बाजूलाच मश्जिद आहे. महानगरपालिकेच्या रेकॉर्डला २३ दुकाना आहेत.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : स.सदस्य श्री.सतिष कटकटे आणि आम्ही दुकानांची पहाणी केली एकंदर २३ दुकाने आहेत व परत ०३ दुकाने तिथे आलेली आहेत.माझ्या माहितीप्रमाणे त्या ०३ दुकानांचे भाडे येत नाही. सदरील दुकाने अवैधरित्या आहेत. त्या काढण्याचे सांगण्यात आले आहे.

श्री.सतिष कटकटे : संबधीतांवर गुन्हा दाखल करण्यात यावा. कार्यवाही करण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : दुकाने बेकायदेशीर असेल तर उद्याच काढावे.

मा.सभापती : सदरील ठिकाणी २६ दुकाने आहे याची पहाणी उपआयुक्त(प्र.) यांनी केलेली आहे ज्या तिन दुकाने आहे ते अनधिकृत असेल तर त्या तात्काळ काढण्यात याव्या आणि पुढील बैठकीमध्ये माहिती सादर करावी. मिर सलामी हॉलच्या दुकांनाबद्दल आणि श्री.रविकांत गवळी यांनी उपस्थित केलेल्या दुकांनाबाबत पुन्हा भाडे समितीकडे देण्यात येईल आणि येणाऱ्या स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात येईल. भाडे समितीने विचार करून त्यावर निर्णय घ्यावा. सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीने जे मार्गदर्शन केलेले आहे ते पाहावे. त्यावर विचार करून भाडे निश्‍चित करावे आणि पुढील बैठकीत आणावे.

उपआयुक्त (प्र) : भाडे समितीमध्ये मुख्य लेखापरिक्षक, उपआयुक्त आणि कार्यकारी अभियंता या चार व्यक्तींची समिती आहे. समितीमध्ये डिएसआरचे रेट आहे ते लक्षात घेवून भाडे निश्‍चित केले जाते. तिन वेळेस टेंडर निघून प्रतिसाद मिळाला नाही हि बाब समितीच्या निर्देशनास आणुन आणखी काही भाडे कमी करता येईल किंवा कसे याबाबत फेर आढावा घेण्यात येईल.

मा.सभापती : मालमत्ता अधिकारी यांना विचारणा केली असता भाडे हे प्रति वर्षी आहे का प्रति महा आहे. ८४ हजार प्रति महा भाडे असून एवढे भाडे कोण देणार त्या ठिकाणी तिन फुट पाणी साचलेले असते.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाचे म्हणने आहे की, ऑडिटमध्ये प्रॉब्लम येवु शकतो गेल्या १२ वर्षापासून दुकाने रिक्त अवस्थेत आहे.

उपआयुक्त (प्र) : पुढील बैठकी पर्यंत फेरआढावा घेण्यात येईल याबाबत एका महिण्यात अहवाल देण्यात येईल.

श्री.विनायक पांडे : विषय क्रमांक २१५ इतिवृत्तामध्ये मंजूरीसाठी आलेला आहे महिला व बाल कल्याण समितीने विषय क्रं.०६ दि.०२.०१.२००८ अन्वये महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत हेल्पर्स फॉर हॉस्पीटल्स ॲन्ड नर्सिंग होम प्रशिक्षण देण्यास मंजुरी दिलेली आहे. हि मंजूरी २००८ मध्ये दिलेली आहे. आता २००९ आहे.

श्री.सतिष कटकटे : भाडे समितीने स्थायी समितीकडे मंजूरीकरीता पाठविले असता भाडे कमी केले म्हणून ऑडिटमध्ये येते. बऱ्याच वर्षापासून रिक्त असलेल्या दुकांनाबाबत ऑडिटमध्ये याचा उल्लेख होतो काय?

श्री.सिताराम सुरे : वॉर्ड क्रमांक २ मधील कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा आहे त्यांनी मनपाकडे ले-आउट मंजूरीसाठी दाखल केलेले आहे असे मला दि.१२ तारखेच्या वर्तमानपत्रातुन समजले आहे. याबाबत मा.महापौर, सहाय्यक संचालक नगर रचना, मा.आयुक्त, मा.सभापती यांना पत्र दिलेले आहे. सन १९८८साली महानगरपालिकेकडे जेव्हा ले आउट दाखल केलेला होता त्यावेळी ले आउटमध्ये एक नाला दाखविण्यात आलेला होता आज दाखल केलेल्या ले आउटमध्ये नाला दाखविण्यात आला आहे किंवा नाही का गायब झाला आहे.१९८८ साली श्री.वैजिनाथ काळे सभापती होते त्यांनी एक लेआउट दाखल केलेला होता त्यावेळी मंजूरी मिळालेली होती. त्यानंतर १९९८ साली २०० गाळे त्यात भाजी मंडई,फळ मार्केट ,धान्य मार्केट,सेल हॉल अशे बऱ्याच प्रकारे बांधकाम केलेले आहे. आज कृषी उत्पन्न बाजार समितीस मंजूरी घेण्याची गरज काय पडली? माझ्या माहितीप्रमाणे संपुर्ण मार्केट समिती अनाधिकृत आहे. त्याकाळी १० एकर जागा आपण हस्तांतरण करून घेतली होती. त्याची रजिस्ट्री झाली आहे का नाही याची माहिती नाही. नाला का गायब झाला याचा खुलासा करण्यत यावा.

मा.सभापती : ले आउट मंजूरीसाठी आलेला आहे त्यात नाला आहे काय?

श्री.सिताराम सुरे : तेथील नागरीकांची १७५ एकर जागा घेतलेली आहे माझी स्वतःची ११ एकर जागा गेलेली आहे. त्याकाळी माझ्या शेतातुन १५० फुट रूंद नाला वाहत होता. नाल्या तेथुन उडविलेला असेल सिमा निश्चित नसेल केली तर वॉर्ड क्रमांक २ मयुर पार्क पासून ऑडिटर सोसायटी, सुरेवाडी, जाधववाडी हे पावसामुळे वाहुन जाण्याची शक्यता आहे. पूर्वेकडे नैसर्गिक उतार आहे.

मा.सभापती : कृषी उत्पन्न समितीने महानगरपालिकेचे नावावर जागा करून दिलेली नाही. जोपर्यंत २५ एकर जागा महानगरपालिकेच्या नावावर करून देत नाही आणि त्याची सात बारा तयार करून ज्या प्रमाणे सर्वसामान्य नागरीकांना कायदा करता त्याप्रमाणे कृषी उत्पन्न समितीलाही कायदा लावावा. जो पर्यंत २५ एकर जागा सात बारावर महानगरपालिकेचे नांव आणुन देत नाही तोपर्यंत कुठल्याही लेआउटला मान्यता देवु नये.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डातील नाला हा अत्यंत महत्वाचा आहे त्यांनी नाला हा सपाट केलेला आहे. आपल्या डिपी प्लॅन मध्ये आहे परंतु त्यांच्या लेआउटमध्ये नाला आलेला नाही.

मा.सभापती : सदरच्या संचिकेची पहाणी केलेली आहे सन १९८८ सालीच्या लेआउटमध्ये नाला आहे परंतु आत्ताच्या ले आउटमध्ये नाला दाखविण्यात आलेला नाही.

श्री.सिताराम सुरे : मला आपल्याकडे न्याय नाही मिळाला तर मी शासनाकडे जाईल.

मा.सभापती : मा.शहर अभियंता हे त्या जागेची पहाणी करून अहवाल सादर करतील.

श्री.प्रशांत देसरडा : मार्केट कमीटीने जागा ताब्यात घेतली त्यानंतर महानगरपालिकेला सुचले कि स्मशानभुमी तयार करायची आपण ती जागा ताब्यात घेतली आपण पैसे कुणाला द्यायला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शेतकऱ्याला.

श्री.प्रशांत देसरडा : मार्केट कमिटीने संपादन केली. मार्केट कमिटीने ताब्यात घेतली. तेथे स्मशानभुमी आहे. स्मशानभुमीची पैसे मालकाने घेतले ती ही चौकशी करावी.

श्री.बापू घडमोडे : अनेक वर्षापासून नागरीक आपल्याकडे ले आउटबाबत मागणी करतात आपण नागरीकांना वेगवेगळया कारणांमुळे चकरा मारायला लावतो, त्यामुळे शहरात अवैधरित्या प्लॉटिंग होते त्यामुळे गुंठेवारीचा उदय झाला. गुंठेवारीच्या माध्यमातून मुलभूत सुविधा देता येत नाही. विकासात्मक दृष्टीकोन ठेवावा. आपण सर्वांच्या आशिर्वादाने शहर बकाल झाले आहे. कायदेशीर बाबी तपासावे. अडवणूक न करता मंजुरी द्यावी. कोणी ले आउट मंजूरीकरीता येत असेल विकासात्मक दृष्टीकोण ठेवून त्यास मंजूरी दिली गेली पाहिजे. व बाजार समितीस लवकारात लवकर मंजूरी द्यावी.

मा.सभापती : साधारण व्यक्ती बांधकाम परवानगीसाठी येतो जोपर्यंत तो जागा महानगरपालिकेच्या नावावर आणुन देत नाही पी आर कॉर्ड तयार करून आणुन देत नाही तोपर्यंत टिपी सेक्शन बांधकाम परवानगी देत नाही. २५ एकर जागा महानगरपालिकेने ५ कोटी रूपये टॅक्स आणि २० लाख रूपये १९९८साली दिले आणि आजपर्यंत २५ एकर जागा महानगरपालिकेला मिळाली नाही त्याचे रजिष्ट्री पीआर कार्ड झालेले नाही. जो पर्यंत खरेदी खत करून देत नाही किंवा रिलिक्वीशमेंट डिड (Relinquishment deed) करून देत नाही, पीआर कार्ड आणुन देत नाही तोपर्यंत बांधकाम परवानगी देत नाही. तर सामान्य जनतेसाठी वेगळा न्याय व इतर व्यक्तिंसाठी वेगळा न्याय प्रशासनाने खुलासा करावा. लेआउट मंजूर करण्याचा आणि एसएफआय देण्याची टिपी विभागाची पध्दत काय आहे.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाने याबाबतीत फार सकारात्मक विचार केलेला आहे वर्तमानपत्रात आम्ही वाचले आहे की, ले आउट मंजूरी करण्यासाठी दिड वर्षाचा आगाउ चेक ,८८ लाख, १ कोटी रक्कम घ्यायची होती त्यामध्ये ९ टक्के व्याज लावुन पाच स्टेप मध्ये द्यायचे यासंदर्भात खुलासा करण्यात यावा.

उप अभि.(न.र.) : एखादा रेखांकन मंजूर करायचे असेलतर त्याची खुली जागा आणि रस्ते प्रथम महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेण्यासाठी रजिष्टर्ड रिलिक्वीशमेंट डिड (Relinquishment deed) करून दिल्यानंतर त्या संबधीताने लवकारात लवकर महापालिकेच्या नांवे ति जागा करून देणे.

मा.सभापती : बाजार समितीस सन १९८८ साली ले-आउट करून दिले २५ एकर जागा महानगरपालिकेने ५ कोटी रूपये टॅक्स आणि २० लाख रूपये दिले मागील वर्षी बाजार समितीच्या सभापती ऑफिसला सिल केलेले आहे.

उप अभि.(न.र.)श्री.निकम : सदर संचिकेबाबत जास्त माहिती नाही. १० एकर जागा दिलेली आहे.

मा.सभापती : बाजार समिती बाबत खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : सदरचा विषय हा मालमत्तेचा आहे. उपअभियंता (बीओटी) माहिती देईल.

उपअभियंता (बीओटी) : २५एकर जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेकडुन घ्यायची होती त्यांच्या ताब्यात १० एकर जमीन होती १० एकर जमीनचा करारनामा करून दिलेला आहे आणि आपण adhoc (तदर्थ) म्हणून २० लाख रूपये त्यांना दिलेले आहे दि.०६ एप्रिल १९९८ ला आणि ०७ एप्रिल १९९८ ला ताबा करून घेतलेला आहे पंचनामा केलेला आहे.

श्री.सिताराम सुरे : वाहतुक नगरचे आरक्षण किती एकरवर आहे.

मा.सभापती : २५ एकर वरून १० एकर जमीन घेतल्याची सर्वसाधारण सभेची परवानगी घेतली आहे काय?

उपअभियंता (बीओटी) : १९८८ ला झालेले आहे.

मा.सभापती : प्रशासन चुकीची माहिती देवून सभागृहाची दिशाभुल करीत आहे. कायदेशीररित्या ठोस माहिती कोण देणार, पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

उपअभियंता (बीओटी) : १९९८ मध्ये करारनामा केलेला आहे

मा.सभापती : पुर्वीच्या आणि आत्ताच्या MRTP Act मध्ये बदल झालेला आहे काय?

शहर अभियंता : सर्वांना समान नियम लावले जाते.

मा.सभापती : अमरप्रीत येथील १.५ कोटीची उधारीवर बांधकाम परवानगी दिली आहे. सकाळ या वर्तमानपत्रात याबाबत बातमी आली आहे खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : परवानगी दिली त्यावेळेस अधिकारी कोण होते.

श्री.प्रशांत देसरडा : उधारीवर परवानगी दिली याबाबत सविस्तर खुलासा देण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : दैनिक सकाळमध्ये जो विषय आला होता त्यामध्ये सन २००४ मध्ये त्या व्यक्तिने बांधकाम परवानगी मागीतली त्यावेळेस सिटी सर्व्हे नंबरमध्ये जो अनुक्रमांक होता त्यानुसार त्यांनी पत्रव्यवहार केलेला नाही रोडमध्ये जागा हस्तांतरीत झाल्यानंतरसुध्दा आपल्याकडे ती लावुन घेतली नाही. त्या बांधकाम परवानगीचे ७ लाख ७६ हजार बाकी असतांना महागनगरपालिकेत संचिका सापडत नाही.

मा.सभापती : ॲटो डिसीआरप्रमाणे बांधकाम परवानगी दिली जाते.

श्री.प्रशांत देसरडा : ज्याप्रमाणे ई टेंडरींग आहे त्याप्रमाणे ॲटो डिसीआर आहे. ॲटो डिसीआर संबधी चौकशी झाली पाहिजे. दिनांक १२.०६.२००९ ला पत्र दिलेले आहे.

मा.सभापती : स.सदस्य श्री.सुरे यांनी यासंदर्भात दिनांक १२.०६.२००९ ला पत्र दिले होते त्यांनी पत्र दिल्यावर संचिकेची पहाणी केली स.सदस्य श्री.कटकटे यांनीही माहिती घेतली म्हणून लिखीत पत्र देण्यात आले.

श्री.प्रशांत देसरडा : सदरील संचिकेत खाडाखोड झाल्यास जबाबदार कोण. आपण पत्र दिल्यानंतर हलगर्जीपणा करून त्यात काही बदल केला तर त्याच्यामुळे रेडी रेकनर रेट आणि ज्या स्के.फुट प्रमाणे पैसे घ्यायला पाहिजे ते घेतले नाही जागा एकाच्या नावावर चेक तिसऱ्याचा या सर्व गोष्टींची चौकशी झाली पाहिजे.

म.सभापती : परवानगी एकाच्या नावाने आणि चेक दुसऱ्याच्या नावाचा यासंदर्भात खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : सर्व प्रथम परवानगी दिली का, परवानगी दिली तर त्याचे बेटरमेंट चार्जेस, सिटी डेव्हल्पमेंट चार्जेस आपण घेतले आहे का.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : मा.आयुक्तांनी स्पष्टपणे त्या संचिकेत लिहिले आहे की, बेटरमेंट चार्जेस, प्लस सिटी डेव्हल्पमेंट चार्जेस भरल्यास मान्य. परंतु आधिकाऱ्यांनी ७लाख ७८ हजार भरून घेतलेले नाही. |
| श्री.प्रशांत देसरडा | : ते ७० लाख होतील. फाईलमध्ये गोंधळ दिसतो. संचिका हरवेल, पुण्याला चौकशीला जाईल. बाजुच्या इमारतीचे आणि हया इमारतीचे रेट समान असायला पाहिजे. त्याचीही चौकशी झाली पाहिजे. सदरील संचिका हि हरवेल त्यामुळे हि संचिका मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (म.) यांचेकडे ठेवण्यात यावी. |
| मा.सभापती | : सदरील प्रकरण हे गंभीर स्वरूपाचे आहे रोड कटिंगमध्ये जी जमीन गेली त्यावर आपण त्याला सन २००५ मध्ये एफएसआय देवून टाकले आणि सन २००८ मध्ये बांधकाम परवानगी दिली त्यामध्ये ते नकार देतात. महानगरपालिकेकडे चुकीचे क्रमांक दाखवतात. त्याचे मिळकतीचा सिटी एस नंबर वेगळा आहे आणि नंतर सांगतात की, मी देणार नाही आणि महापालिका बांधकाम परवानगी देतात. जागेच्या मोबदल्यात करोडो रूपयांची मागणी केली. जागा, संचिका, पेपरही त्यांच्या ताब्यात तर नविन परवानगी देवून काय साधणार आहे. |
| शहर अभियंता | : अमरप्रीत हॉटेल बाबत बोलत आहोत , अमरप्रीत हॉटेलला जेव्हा परवानगी देण्यात आली आहे त्यात काही अनियमितता दिसते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत अनियमितता दिसते. सदस्यांच्या म्हणण्या नुसार यात सखोल चौकशी झाली पाहिजे माझ्यामते थर्ड पार्टी चौकशी करणे जरूरीचे आहे. चौकशी केल्यानंतर सत्य समोरे येईल. बांधकाम संपलेले आहे. |
| श्री.सतिष कटकटे | : पोस्ट डेटेड चेक कुठल्या नियमानुसार दिलेला आहे यासंबधीचा खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | : उधारीवर बांधकाम परवानगी देता येते का?बेटरमेंट चार्जे, सिटी डेव्हल्पमेंट चार्जे न भरता परवानगी देता येते का?संबधीतास सन २००५ मध्ये बांधकाम परवानगी दिली त्यावेळी एफएसआय दिला नंतर संचिकेमधून गायब कसे झाले. |
| शहर अभियंता | : हे सर्व त्या-त्या आयुक्तांनी केले. |
| मा.सभापती | : मा.आयुक्तांची चुक नाही. श्री.बंड साहेबांचे स्पष्ट आदेश होते. |
| श्री.विनायक पांडे | : त्यावेळेचे अधिकारी कोण होते. |
| शहर अभियंता | : श्री.चामले व त्यावेळी होते. |
| श्री.सतिष कटकटे | : ३६ लाखाचा चेक पोस्टडेटेड कुठल्या नियमानुसार घेता येतो व सध्या चेक कुठे जमा आहे.खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :लेखा विभागात दिड वर्षानंतरचा पोस्टडेटेड चेक घेउ शकता काय? चेक घेण्याची संभाळण्याची जबाबदारी कुणाची. चेक आहे का. |
| मुख्यलेखाधिकारी | : मी या ठिकाणी मुख्यलेखाधिकारी म्हणुन दिनांक ०२ जुन रोजी रूजू झालेलो आहे यापुर्वी औरंगाबाद जिल्हा परिषदमध्ये चार वर्ष काम केलेले आहे आणि महानगरपालिकेमध्ये मुख्यलेखाधिकारी या पदावर रूजू झालेलो आहे.स.सदस्य आणि मा.सभापती यांनी जो प्रश्न विचारला कि ,जो धनादेश पोस्टडेटेड घेण्यात |

आला आहे. पोस्टडेटेड चेक घेण्याची पध्दत कुठल्याच नियमामध्ये नाही. लेखाविभागामध्ये तो चेक जमा नाही संबधीत विभागामध्ये तो चेक जमा असेल. सदरील चेक लेखाविभागात नसावा. तरी निश्चितपणे यासंबधी खात्री करण्यात येईल.

श्री.प्रशांत देसरडा : सदरचा विषयासी संबधीत संचिका ताबडतोब मागविण्यात यावी. संचिका मा.प्र.आयुक्त यांच्या ताब्यात देण्यात यावे संचिकेमधून चेक गायब होतील. याबाबतची सखोल चौकशी अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावी.

मा.सभापती : आयुक्त हे रजेवर आहेत. तरी असे आदेश देण्यात येता की, आजच्या आज सदरील संचिका मा.प्र.आयुक्त यांचे ताब्यात देण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : ३६लाखाचा जो चेक घेतला आहे त्यावर व्याज लावण्याचा अधिकार कुणाचा आहे. व्याज घेतलेले आहे काय. ADTP ने संचिका हाताळली आहे त्यांनी मंजूरी दिली आहे. सबमिशन ज्युनिअर इंजिनिअर यांनी केले आहे.

मा.सभापती : व्याज लावण्याचा अधिकार कुणाचा आहे.

मुख्यलेखाधिकारी : मुळात कुठल्याही बाबीवर कुठलही एखादे प्रकरणात थकीत रकमा असेलतर व्याज लावण्याची कारवाई प्रथमतः प्रशासनानेच केली पाहिजे. पुढील काही निर्णय घ्यायचा असेलतर स्थायी समितीमध्ये येईल.

मा.सभापती : जे व्याज लावलेले आहे त्यास स्थायी समितीची मंजूरी घेतलेली आहे काय?

श्री.सतिष कटकटे : ३६ लाखावर ९ टक्के व्याज लावले जाते.

मा.सभापती : नियम २६८ प्रमाणे १८ टक्केपासून कमी व्याज आपल्याला लावण्याचा अधिकार नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्यांनी हे काम केलेले आहे त्यांना सभेसमोर बोलविण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : बऱ्याच वेळपासून प्रकरणावर चर्चा चालू आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की रेटलिस्टचे काम वॉर्डात करायचे असेलतर बजेट नसल्यामुळे लेखाविभागातून ती परत येते. अशा परिस्थितीमध्ये पोस्टडेटेड चेक घेवून परवानगी देतात, अधिकाऱ्यांचे तिन महिण्यांचे पगार आगाऊ स्वरूपात डिपॉझिट असले पाहिजे. परंतु ते सुध्दा सध्या जमा नाहीत. अशी बिकट परिस्थिती महानगरपालिकेची आहे आज सर्वसामान्य व्यक्तिंच्या मनात नगरसेवकांबद्दल जो राग आहे त्याला अधिकारी कुठेही समोर जात नाही. सदरील प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे महापालिकेचे लाखो रूपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे या प्रकरणात जो कुणी अधिकारी असेल त्यास सेवेतुन बडतर्फे करण्यात यावे. संचिका प्र.आयुक्त यांच्या कस्टडीमध्ये ठेवण्यात यावी याची चौकशी ०३ दिवसाच्या आत करून स्थायी समितीस अहवाल सादर करण्यात यावा व तोपर्यंत प्रशासनाने बांधकाम थांबवावे.

मा.सभापती : जालना रोड येथील सिटीएस नंबर १३१६७चे बांधकाम त्वरीत थांबविण्यात यावे या प्रकरणाची मुळ संचिका आजच्या आज मा.प्र.आयुक्त श्री.घुगे यांच्या कस्टडीमध्ये देण्यात यावे. मा.प्र.आयुक्त आणि मुख्यलेखाधिकारी यांनी या प्रकरणाची ०३ दिवसात सखोल चौकशी करून स्थायी समितीकडे अहवाल सादर करण्यात यावा स्थायी समितीत निर्णय घेण्यात येईल.

श्री.नारायण कुचे : शासनाने सन २००९-१० मध्ये ८वी ९वी १०वीच्या वर्गासाठी मान्यता दिली आहे. स.नगरसेवक श्री.डांगे यांच्या प्रयत्नामुळे यश मिळाले आहे. ८वी ९वी १०वीच्या वर्गासाठी शिक्षक उपलब्ध नाही. मुकूंदवाडी येथील शाळेत ८वीच्या वर्गात ९९ विदयार्थी संख्या आहे ९वीच्या वर्गात ७८ आणि १०वीच्या वर्गात ४५ विदयार्थी संख्या आहे. प्रत्येक वर्गावर विषयावाईज शिक्षक देण्यात यावेत. विनाअनुदान तत्वावर शासनाने मान्यता दिली आहे. त्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे त्यासंदर्भात काय कारवाई करणार आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शासनाने असे निर्देश दिले आहे की, जिल्हा परिषद, महानगरपालिकांना तुकडया वाढीव मिळत असेल तर त्यांनी त्यांच्या त्यांच्या आर्थीक तरतुद करून सर्व व्यवस्था त्यांनी पहावी. या अटीवर तुकडयांवर मान्यता मिळाली आहे.

श्री.विनायक पांडे : शैक्षणिक वर्ष सुरू झालेले आहे ज्या नविन तुकडयांना मंजूरी मिळालेली आहे त्याबाबत काही तरतुद प्रशासनाने केलेली आहे काय?

उपआयुक्त(प्र) : गेल्या दोन वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा चालू होता. महानगरपालिकेने दोन शाळा पुर्वीच सुरू केल्या होत्या नविन १२ शाळेचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविला होता. शासनाने ११ तारखेला मंजूरी देवून महानगरपालिकेने स्वतःच्या खर्च करायचा असून शासन यावर कोणतेही अनुदान देणार नाही. या अटीवर शासनाने मंजूरी दिलेली आहे. सध्या मिटमिटा आणि मुकूंदवाडी येथे ७ वी आणि ८ वीचे वर्ग सुरू केलेले आहे आता ९वी आणि१०वीचे वर्ग सुरू करायचे आहे. यासाठी एका तुकडीला १.५ प्रमाणे साधारणतः प्रत्येक विषयाशी निगडीत १५ शिक्षक लागणार आहे. दोन मराठी आणि एक उर्दु शाळेत वर्ग सुरू करायचे म्हटल्यावर साधारणतः १० लाखाचा वार्षीक खर्च अपेक्षीत आहे. याबाबत सविस्तर टिप्पणी करून सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात येईल व कमीत कमी यावर्षी पासून वर्ग चालू करण्याचा प्रयत्न होईल.

श्री.विनायक पांडे : १२ शाळेचे नाव आलेले आहे त्या १२ शाळा यावर्षी पासून चालू करणार काय?

उपआयुक्त (प्र) : १२ शाळांना मान्यता आलेली आहे, माध्यमिक शाळा हर्सुल, माध्यमिक शाळा नारेगांव, मुकूंदवाडी, सिडको एन-७, इंदिरानगर,बायजीपूरा, प्रियदर्शनी इंदिरानगर, बन्सीलालनगर, बनेवाडी, मिटमिटा, बेगमपुरा, किराडपुरा आणि शहाबाजार अशा बारा शाळांना तुकडयासाठी मंजूरी आलेली आहे. ९ मराठी व ३ उर्दु शाळा आहेत.

श्री.विनायक पांडे : या बारा शाळांमध्ये वर्ग सुरू होणार आहे का.

उपआयुक्त (प्र) : या बाबतीत कुठलीही commitment करणार नाही. आर्थीक बोजाबाबत काय पडणार हे पहावे लागेल. नियमितपणे दोन वर्गासाठी समायोजन करू.

श्री.नारायण कुचे : अपुर्ण कर्मचारी शिक्षक वर्ग आहे, इमारत अर्धवट अवस्थेत आहे. मुकूंदवाडी येथील शाळेत १० वीचा वर्ग सुरू असून ४५ विद्यार्थी संख्या आहे. सर्व सुविधा केव्हा देणार आहे.

श्री.विनायक पांडे : या शाळांमध्ये अत्यंत गरीब व मध्यमवर्गीय पालकांचे विद्यार्थी शाळेत जातात या शाळांमध्ये ताबडतोब ८वीचे वर्ग चालु करायला पाहिजे. गेल्या तिन ते चार

वर्षापासून नागरीकांची मागणी आहे. प्रशासनाने नियमाप्रमाणे वर्ग सुरू करायचे असेलतर दोन महिणे निघुन जातील आणि नाइलाजाने त्या गरीब विद्यार्थ्यांना दुसरीकडे प्रवेश घ्यावा लागेल.

श्री.नारायण कुचे : उद्या जर दहावीचा निकाल कमी लागला तर प्रशासन/शासन म्हणेल की निकाल कमी लागल्यामुळे शाळा बंद करण्यात याव्या. त्यामुळे लवकरात लवकर सुविधा देण्यात याव्यात.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाचे,पदाधिकाऱ्यांचे आणि नगरसेवकांचे अभिनंदन करण्यात येते की त्यांनी आठवी नववी आणि दहावीच्या तुकडया मंजूर करून आणल्यात. एका विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च काढला तर तो १२०० ते १८०० रूपये येतो. माझी अशी मागणी आहे प्रशासनाला की , समजा मुकूंदवाडी येथे ५५ विद्यार्थीसंख्या असेल तर प्रशासनाने ५५ विद्यार्थ्यांची फिस भरण्यात यावी. आपण तुकडया चालविण्यात येवू नये, शिक्षक/कर्मचारी लावण्यात येवू नये एखादया चांगल्या संस्थेत या ५५ विद्यार्थ्यांना प्रवेश देवून त्यांची संपूर्ण फिस आपण भरावी. अशा प्रकारचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स.सदस्यांनी जो मुद्दा मांडला आहे त्यात खाजगी संस्थेला देयचा तो आपण देवू शकत नाही. महानगरपालिकेमध्ये १२ शाळा मिळाल्या आहे त्यात शिक्षक महानगरपालिकेने भरावयाचे. जो खर्च विद्यार्थ्यांवर,शिक्षकांवर करतो तो खर्च आपल्याला करावाच लागेल. शिक्षक सेवक/शिक्षकांच्या पगाराबाबत एक प्रपोजल सर्वसाधारण सभेमध्ये आणुन ते बजेट प्रोव्हिजन करण्यात यावे. जर एखादी संस्था एनजीओ प्रमाणे चालविण्यात तयार आहे का? अशा पध्दतीचा ठराव आलातरी ते करता येईल. हि काळाची गरज आहे की महापालिकेला आपल्या शाळाचा दर्जा हा सुधारावाच लागेल.

श्री.बापू घडमोडे : स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो जरी नियमात बसत नसेल किंवा असेल तो महत्वाचा विषय आहे.शाळेची गुणवत्ता,विद्यार्थ्यांची प्रगती याचा लेखाजोखा झाला पाहिजे. शाळांना सर्व सुविधा दिली जाती परंतु नागरीक नगरसेवकांकडे टिसी शाळेतून दया म्हणून येतात. शाळेचा शिक्षणाचा स्तर उंचावला गेला पाहिजे. यासंबधीचा प्रस्ताव आणलातर त्यास कोणी विरोध करणार नाही परंतु शैक्षणिक स्तर उंचावण्याकरीता बैठका झाल्या आहे का? यावर गंभीरपणे विचार केला पाहिजे अधिकारी कर्मचाऱ्यांचे विद्यार्थी कानव्हेंटमध्ये जातात गरीब घराचे विद्यार्थी मनपाच्या शाळेत जातात त्यामुळे अधिकारी,नगरसेवकांनी त्याची काळजी घेतली पाहिजे.

श्रीमती मेहरून्निसा खान : महानगरपालिकेच्या शाळेतील इमारत जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून दुरूस्ती,रंग रंगोटी झालेली नाही. शाळेत सर्वत्र दुर्गंधी आहे. इतका खर्च केला जातो तो कुठे जातो, शाळा समिती ठेवावी. वॉच करावे. ७वी च्या विद्यार्थ्यांना नांव लिहीता येत नाही. शाळेवर नियंत्रणासाठी एक कमिटी नेमली पाहिजे. १२ शाळेत आठवी,नववी आणि दहावीचे वर्ग सुरू केले पाहिजे.

श्रीमती मोमिन सफिया: माझ्या वार्डात ब्रिजचे काम आहे वर्क ऑर्डर होउन काम सुरू झाले नाही.

कार्य.अभि.(डि.पी.कुलकर्णी) : कार्यादेश देण्यात आलेले आहे आचारसंहिता असल्याकारणाने थांबले होते.ट्रायलपीट घेण्यात येईल आणि काम सुरू होईल.

श्रीमती मोमिन सफिया: औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ब्रिजचेही वर्क ऑर्डर निघून काम सुरू झालेले नाही.

मा.सभापती : औरंगाबाद टाइम्स कॉलनी येथील १५० लोकांचे डेलिगेशन आले होते वर्क ऑर्डर निघुनसुध्दा गुत्तेदार श्री.मन्नान यांनी काम सुरू केलेले नाही. सदर गुत्तेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

श्रीमती मेहरून्निसा खान : गुत्तेदारास ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. याबाबतीत शहर अभियंता यांना सहा ते सात पत्र देण्यात आले आहे.

मा.सभापती : रिटेंडर करून काम देण्यात यावे नाहीतर त्याच्यानंतर जी कमी दराची निवीदा असेल त्यांना काम देण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे : छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे काम मंजूर होउन वर्क ऑर्डर होउन काम सुरू झाले नाही.

मा.सभापती : औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील काम उद्याच्या उद्या सुरू करा.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : मागील बैठकीत सिटी सर्व्हे नं. ५२/६ ओपन स्पेसवर अतिक्रमण झालेले आहे. त्यावर चर्चा झाली होती.

श्री.रविकांत गवळी : मागील बैठकीत यावर सविस्तर चर्चा झाली आहे मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. पुढील बैठकीत खुलासा करण्यात येईल. असे सांगण्यात आले खुलासा करण्यात यावा. स.सदस्यांनी माहिती काढलेली आहे सन ०२.०१.१९९१ला ले आउटला मंजूरी मिळालेली आहे. त्यावेळेस १५ टक्के ओपनस्पेस हा महानगरपालिकेचा असतांना सुध्दा सिटी सर्व्हे नंबरवर परस्पर नांव लिहिले जाते त्यानंतर तो व्यक्ति प्लॉट विकुन त्यावर परस्पर नांव लावले जाते. ती खुली जागा आहे.

श्री.बापू घडमोडे : हि बाब गंभीर स्वरूपाची आहे स.सदस्यांनी मागच्या बैठकीत विषय मांडला त्यांनी सर्व माहिती आणली परंतु प्रशासनाने काय केले.

मा.सभापती : प्रशासनाने एका इमारत निरीक्षकास निलंबीत केलेले आहे

श्री.रविकांत गवळी : इमारत निरीक्षक कोण आहे.

मा.सभापती : पुढील बैठकीत मा.आयुक्त रजेवरून आल्यावर खुलासा घेवू.

श्रीमती मेहरूनिसा खान : मागील बैठकीत जुनाबाजार येथील अतिक्रमण काढण्यास सांगीतले होते परंतु ते अतिक्रमण काढण्यात आले नाही.

श्री.रविकांत गवळी : स.सदस्यांनी माहिती काढली आहे कोर्टाने निकाल दिला आहे त्यानुषंगाने त्याची प्रत देण्यात येते. याबाबतीत खुलासा करण्यात यावे.

मा.सभापती : सिटी सर्व्हे नंबर ५२/६ चे कागदपत्र शहर अभियंता यांचे कडे देण्यात येते तसेच काम थांबविण्याचे आदेश देण्यात येते.

श्री.नारायण कुचे : मागील बैठकीत इमारत निरीक्षण यांच्याबाबत विषय मांडला होता त्याबाबतीत काय कारवाई केली आहे.

शहर अभियंता : त्या ओपनस्पेसमध्ये जर बांधकाम चालू असेलतर तात्काळ बांधकाम परवानगी रद्द केली जाईल.

श्रीमती मेहरूनिसा खान : ओपनस्पेसवर बांधकाम परवानगी देताच कशी.

श्री.प्रशांत देसरडा : ३०.०५.२००६ रोजीच्या बैठकीत स.सदस्यांनी हि बाब निर्देशनास आणुन दिली मा.आयुक्तांनी त्यांचे अभिनंदन केले परंतु प्रशासनाने आजपर्यंत काहीही कारवाई केलेली नाही.

श्रीमती मेहरुन्निसा खान : १०० मीटरच्या रस्त्यावर अवैधरित्या बांधकाम चालू आहे शहर अभियंता यांना वारंवार पत्र दिले कारवाई होत नाही.

मा.सभापती : सर्वे नंबर ५२/६ चे काम ताबडतोब काढण्यात यावे.

शहर अभियंता : आपणांस पोलिस फोर्स मिळत नसल्यामुळे अडथळा येतो.

श्री.प्रशांत देसरडा : नविण जी.आर.ची कॉपी नसेलतर मागवून घेण्यात यावी. अतिक्रमणास जेवढे महानगरपालिका आयुक्त आहे तेवढेच जबाबदार पोलिस कमिशनर आहे. एक प्रत मला द्या.

श्री.नारायण कुचे : मा.शहर अभियंता यांच्यावरील जबाबदारीचा भार कमी करण्यात यावा.

मा.सभापती : जबाबदारी कमी केली आहे. आता टिपी सेक्शन त्यांच्याकडून काढून घ्यायचे आहे.

श्री.सतिष कटकटे : श्री.निकम यांनी काय कारवाई केली यासंबधी माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी उदयाच्या उदया कारवाई करून दोन वाजेपर्यंत माहिती देण्यात यावी.

श्री.बापू घडमोडे : ५ (२) २ कलम बाबत प्रशासनाने माहिती देण्यात यावी. मा.सचिव यांनी खुलासा करावा.

मा.सभापती : ५ (२) २ कलमाचा नगर सचिव यांचा संबध नाही. श्री.डि.पी.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ नियम (२) २ प्रमाणे कामाला तातडी असेल तरच मा. स्थायी समितीच्या मंजूरीने ५ (२) २ प्रमाणे विना निवीदा काम देता येते.

श्री.बापू घडमोडे : किती रूपयांपर्यतची मर्यादा आहे. विषय पत्रिकेत बरीच कामे हि ५ (२) २ प्रामणे केलेले आहे. एवढी कामाची कोणती तातडी होती. गाव वाहून चालले होते, नाल्यात वाहत होते, शहरावर संकट आले होते अशी कोणती तातडी होती त्या विषयांबाबत माहिती द्यावी.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक २२४, लेखा विभागाचे नुतनीकरण करणे बाबत ५ (२) २च्या तरतुदीनुसार काम केले आहे.

श्री.बापू घडमोडे : ०९.०२.२००९ रोजी एक विषय मंजूर झाला आहे सिध्दार्थ उद्यान येथील विद्युत खांबावरील उघडया तारा काढणे, पथदिव्याचे काम या अंतर्गत केले आहे. २६.०२.२००९ रोजीच्या प्रस्तावात सिध्दार्थ उद्यानातील गर्डर पोल व ओव्हरहेड तारा काढणे व भुमीगत केबल टाकणे. याबाबत खुलासा करण्यात यावा. उघडया तारा आणि ओव्हरहेड तारा काय प्रकार आहे.

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक २१५ महिला बाल कल्याणचा विषय सन २००८ला मंजूर झाला त्याची २००९ ला परवानगी घ्यायची कि नाही. परवानगी घेतली नाही.

श्री.बापू घडमोडे : ५ (२) २ च्या खाली प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे आणि असे किती तरी कामे आहेत की त्याची तातडी नाही. याची चौकशी करणार आहात का?

मा.सभापती : स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो महत्वाचा आहे याची माहिती घेण्यात येईल.

श्री.बापू घडमोडे : शाळेच्या दुरूस्तीमध्ये १० लाख वाढविण्यात आले २३ लाखाचे काम होते १० लाख वाढविण्यात आले. सगळयाच कामांना तातडी होती का?

मा.सभापती : शहर अभियंता यांनी तात्काळ माहिती देवून चौकशी करण्यात यावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : वार्डात पॅचवर्कसाठी सहा महिण्यांपासून टेंडर काढले आहे परंतु मशिन नादुरूस्त असल्याकारणाने काम बंद आहे. आता पावसाळा सुरू झाला आहे यापुर्वी आचारसंहिता होती, बजेट नव्हते आता काम केव्हा सुरू करायचे.

मा.सभापती : सदरील काम तातडीने केले पाहिजे. याप्रकरणी शहर अभियंता यांनी जातीने लक्ष घालून काम सुरू करावे.

श्रीमती मेहरून्निसा खान : महिला व बाल कल्याण समितीने ३० लाखाच्या मशीन दिलेले आहे ते स्टोअर मार्फत दिले आहे का, की सांस्कृतिक अधिकारी यांनाच अधिकार दिले आहे. मशीनीचे गॅरंटि कार्ड दिलेले नाही.

मा.सभापती : असे अधिकार कुणालास नसतात.

श्रीमती मेहरून्निसा खान : विधानसभेत श्री.सतिष चव्हाण यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. गॅरंटी कार्ड नाही. जनता बाजार येथील ईंशाचे ९ लाख रूपये बील.

मा.सभापती : याबाबत पुढील बैठकीत पुर्ण माहिती देण्यात यावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद